Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# आंधळ्याच्या गायी व हंस अकेला : स्त्रीत्वचा शोध घेणाऱ्या कथा

डॉ.रमेश श्रीरंग औताडे,
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव,
ता. सोयगाव
जि. छत्रपती संभाजीनगर.

*हंसा अकेला मधील कथा वैयक्तिक, अंतर्मुख स्वरूपाच्या आहेत. त्या स्वतःशी प्रामाणिक संवाद साधतात. या कथासंग्रहातील एकटी स्त्री वैयक्तिक गाठी उकलणारी एकाकी पण विचारतील दिसून येते.*

*आंधळ्याच्या गाई मध्ये कथा अधिक प्रतीकात्मक आहेत – जसे की "आंधळ्या गाई" हे प्रतीकच एक संपूर्ण सांस्कृतिक मानसिकतेचे प्रतिनिधित्व करते. येथील मुलगी वडील पित्रसक्तकता मुलगी त्या पिढीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणारी आहे. स्त्रीचे अंतर्मन केंद्रस्थानी: दोन्ही संग्रहांत स्त्रीच्या भावविश्वाचे सूक्ष्म चित्रण आहे.*

*नात्यांतील ताण: कधी पती, कधी वडील– स्त्रीचं स्वतःशी आणि इतरांशी नातं नेहमी गुंतागुंतीचं असतं.*

*स्वतःच्या अस्तित्वाचा शोध: स्वतःला सापडण्याची प्रक्रिया– हा दोन्ही कथासंग्रहांचा गाभा आहे.*

*मेघना पेठे यांच्या 'हंसा अकेला' आणि 'आंधळ्याच्या गाई' या दोनही कथासंग्रहांत स्त्रीजीवनाच्या विविध छटा– एकटेपणा, संघर्ष, नात्यांतील विसंवाद, आणि अस्तित्वाचा शोध– अत्यंत प्रभावी शैलीत सादर होतात.*

*हंसा अकेला वैयक्तिक आणि भावनिक गहिवर असलेला संग्रह आहे. हंसा अकेला या कथासंग्रहाचा आशय स्त्रीच्या अस्तित्वाच्या शोधाभोवती फिरतो. लैंगिकता ही नुसती शारीरिक गरज नसून मानसिक व सामाजिक गुंतागुंतीचा भाग आहे, हे अनेक कथांमधून सूक्ष्मतेने व्यक्त होते.*

*यात सामाजिक चौकटी, परंपरेचे बंधन, लैंगिकतेची गुंतागुंत आणि स्त्री-पुरुष संबंधांचा भावनिक गुंता हे सारे परखडपणे मांडलेले आहे.*

*आंधळ्याच्या गाईमध्ये प्रतीकात्मकतेद्वारे सामाजिक ढाच्यांची सूक्ष्म चिकित्सा आहे.*

*मेघना पेठे यांचे कथालेखन हे आधुनिक मराठी स्त्रीसाहित्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यांनी स्त्रीजीवनातील असंख्य अपरिभाषित भावना, आकांक्षा आणि बंधनांचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या कथा या केवळ मनोरंजनासाठी नसून, अंतर्मुख करणाऱ्या आणि मनात विचारांचे वादळ निर्माण करणाऱ्या आहेत. त्या आजच्या स्त्रीच्या अस्मितेचा, अस्तित्वाच्या शोधाचा एक गहिरा दस्तावेज आहे. मेघना पेठे यांच्या 'आंधळ्याच्या गायी' या कथासंग्रहात स्त्रीजीवनातील भावनिक गुंतागुंत, अन्याय आणि अंतर्मनातील स्फोटक वास्तवाचे चित्रण आहे. यात स्त्रीवर लादलेली मूल्ये, विवशता, लैंगिक शोषण, मानसिक ताण आणि आत्मशोध हे प्रमुख आशय आहेत. नायकिणींचे अंधारलेले जीवन, बधीर समाजव्यवस्था, आणि स्त्रीच्या गोंधळलेल्या अस्मितेची ही कथा आहे. लेखिकेने 'गायी' या प्रतीकेद्वारे स्त्रीच्या सौम्य, सहनशील पण आंधळ्या बनवलेल्या अवस्थेचे चित्र रेखाटले आहे.*

*स्त्रीची वेदना, मौनातला आकांत, पुरुषसत्ताक चौकटीत अडकलेली तिची ओळख आणि स्वातंत्र्याची धडपड — या कथा अशा अनेक पातळ्यांवर संवाद साधतात. या कथांतून हळुवार पण जबरदस्त विद्रोह उमटतो. संवेदनशील भाषाशैली, प्रतीकात्मकता आणि वास्तवाचा कलात्मक आलेख हे या कथांचे आशयात्मक वैशिष्ट्य आहे. एकूणच, 'आंधळ्याच्या गायी' स्त्रीमनाच्या खोल जखमा समोर आणणारा, अस्वस्थ करणारा आणि विचारप्रवृत्त करणारा संग्रह आहे.*

*मेघना पेठे यांच्या 'हंसा अकेला' आणि 'आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहांचे सखोल विश्लेषण करताना स्पष्ट होते की, त्यांच्या लेखनात स्त्रीच्या वेदनेचा गहिवर, अस्तित्वाच्या उंबरठ्यावरचा झगडा आणि आत्मशोधाची निरंतर वाटचाल ही त्रिसूत्री प्रभावीपणे व्यक्त होते. हे लेखन कुठेही केवळ भावना व्यक्त करणारे न राहता, ते एक मानसिक, सामाजिक आणि अस्तित्ववादी प्रक्रिया म्हणून समोर येते. त्यांच्या लेखनाची सर्जनशीलता आणि सामाजिक जाणिवा वाचकाला अंतर्मुख करतात. आजच्या स्त्रीवादी साहित्याच्या प्रवाहात मेघना पेठे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे आणि त्यांच्या लेखनाचा अभ्यास स्त्रीच्या बदलत्या संवेदनांचा आरसा ठरतो.*

प्रास्ताविक :

मेघना पेठे या  मराठी साहित्यातील समकालीन स्त्रीलेखन हे केवळ अनुभवकथनापुरते मर्यादित न राहता सामाजिक, मानसिक व अस्तित्वाच्या पातळीवरील संघर्षाचे सखोल चित्रण करते. या साहित्यातून स्त्रीचे आत्मशोधाचे प्रवास, तिच्या वेदना आणि अस्तित्वाच्या लढाया प्रत्ययास येतात. मेघना पेठे या समकालीन स्त्रीलेखिकांच्या याच संवेदनशीलतेचा प्रतिनिधित्व करणाऱ्या लेखिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांचे ‘हंसा अकेला’ आणि ‘आंधळ्याच्या गाई’ हे कथासंग्रह स्त्रीच्या वेदनेच्या आणि आत्मप्रत्ययाच्या जगात डोकावण्याचा एक प्रयत्न म्हणून वाचले जाऊ शकतात. या कथांमधून स्त्रीच्या आंतरिक गुंतागुंतीचे, समाजातील पितृसत्ताक साखळ्यांचे आणि तिच्या आत्मशोधाच्या संघर्षाचे भेदक चित्रण दिसून येते.

समकालीन मराठी साहित्यातील एक संवेदनशील व प्रभावी लेखिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी विशेषतः कथा, लघुकथा व स्त्रीमनाच्या कोपऱ्यांत डोकावणारी शैलीदार लेखनप्रवृत्ती जोपासली आहे. त्यांचे लेखन हे केवळ अनुभवकेंद्री नसून आत्मचिंतनशील व सामाजिक भान जागवणारे आहे.' हंस अकेला ' कथासंग्रह १९९७ मध्ये प्रकाशित झाला. तर

'आंधळ्याच्या गायी' हा कथासंग्रह २००० साली  प्रसिद्ध झाला.हंसा अकेला हा मेघना पेठे यांचा एक महत्त्वपूर्ण आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध असा मराठी कथासंग्रह आहे. या संग्रहात एकूण १२ कथा असून त्या आधुनिक स्त्रीचे अस्तित्व, तिचे मानसिक द्वंद्व, समाजातील लैंगिक व सामाजिक भेद, स्त्री-पुरुष नाते, आत्मशोध आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षा या विविध स्तरांवर फिरत राहतात.

या कथा प्रामुख्याने स्त्रीदृष्टीकोनातून मांडलेल्या आहेत.

प्रत्येक कथेत एक संवेदनशील, आतल्या जगाशी लढणारी, अनेकदा एकाकी, पण स्वतःच्या निर्णयावर ठाम असलेली स्त्री दिसते.


ISSN : 2395-6968

लेखिकेने वापरलेली शैली ही वैयक्तिक अनुभवाच्या सीमारेषांवर आधारित असून कथन तंत्र सशक्त, अंतर्मुख करणारे आहे.

कथांचे स्वरूप आत्मकथनात्मक, संवादप्रधान व मनोविश्लेषणात्मक या कथासंग्रहातून बाईपणाचं दु:ख आणि पुरुषद्वेष्टा कांगावा यांच्या पलीकडे जाऊन स्त्रीचं जगणं मेघना पेठे यांनी मांडलं आहे.' हंस अकेला'मधून लैंगिकता, नैतिकता यांचं अवडंबर न माजवता लिंगातीत सहमानवी नात्याचं आणि न-नैतिक जगण्याचं चित्रण त्यांनी आपल्या लेखनातून केलं आहे.

निरनिराळ्या बायकांच्या मनांत हवेहवेसे वाटणारे निरनिराळे पुरुष असू शकतात, बायका निरनिराळ्या असतात तसे पुरुष नसतात हीच एक खंत आहे. माझ्या मते आजकाल 'इंटरेस्टिंग पुरुष' असा उरलेलाच नाही. स्त्री-पुरुष दोघंही हिंसक असतात; पण पुरुषांमधली इनसिक्युरिटी स्त्रियांवरच्या हिंसेला कारणीभूत ठरते,' असं रोखठोक म्हणणाऱ्या मेघना पेठे यांची निरीक्षणशक्ती आणि त्यातून आपल्या पात्रांच्या शरीराचं, स्वभावाचं, भावनांचं वर्णन करण्याची हातोटी विलक्षणच आहे. त्यांची पात्रंसुद्धा अगदी थेट, रोजच्या भाषेत बोलतात. त्यात कुठेही कृत्रिमता किंवा भलत्या उपमा, उत्प्रेक्षांचा मारा नसतो. त्यामुळे ती वाचकाला खूपच आपली, ओळखीची वाटते.

त्यांची थेट भाषा आणि अभिव्यक्ती यामुळे बंडखोर लेखिका अशी त्यांची ओळख झाली आहे; मात्र त्यांचं लेखन बारकाईने वाचलं तर त्याचे अंत:स्तर स्पष्ट दिसतात त्यांच्या कथा स्त्रीमन, ओळखीच्या आणि अनोळखीपणाच्या सीमारेषा, शहरी आयुष्याची पोकळी, प्रेमातील तुटलेपण, लैंगिकता व अस्तित्वाचा शोध याभोवती फिरतात.

**१. स्त्रीची अस्मिता आणि आत्मभान:**

मेघना पेठे यांच्या कथांमध्ये स्त्री ही केंद्रस्थानी आहे. परंतु ही स्त्री पारंपरिक चौकटीतली नाही. ती बंडखोर आहे, प्रश्न विचारणारी आहे, स्वतःच्या भावना उलगडणारी आहे.

उदा. कथेमध्ये स्त्री पात्र आपल्या जीवनातील अपुरेपण, तुटलेपण आणि एकटेपणाचा शोध घेत असते. "हंस अकेला "मधील  कथांमध्ये स्त्रीचे आंतरिक मनोविश्व मोकळेपणाने व्यक्त होते. ती नात्यांमध्ये अडकलेली आहे, पण ते तुटत असतानाही ती कोलमडून पडत नाही.

**२.मानवी नात्यांचे गुंतागुंतीचे मनोविश्लेषण:**

मेघना पेठे यांच्या कथा नात्यांतील सूक्ष्म ताणतणाव, मौन, गैरसमज, आणि तुटलेपण यांचे भेदक चित्रण करतात.

उदाहरणार्थ, एका कथेमध्ये आई आणि मुलीमधील नातं, जी समोरून जरी गोड वाटत असली तरी आतील दुखऱ्या जखमा उलगडल्या जातात. त्या जखमांचे विश्लेषण करताना लेखिका कधीही उघड शब्दांचा वापर करत नाहीत, तर ती हळुवारपणे त्या भावना प्रकट करतात.

**३. शहरी जीवनाची पोकळी आणि भावनिक कोरडेपणा:**

त्यांच्या लेखनात शहरात राहणाऱ्या स्त्रिया, त्यांचे करिअर, नाती, आणि त्यातून निर्माण होणारी एकटेपणाची भावना प्रकर्षाने आढळते.

उदा. एका कथेमध्ये स्त्री करिअर यशस्वी असते, पण तिचे वैयक्तिक जीवन कोलमडलेले असते. त्यातून तिची घुसमट, मानसिक तणाव, आणि आत्मशोध हे सगळं हळुवार पद्धतीने उलगडलं जातं.

**४. स्त्री-पुरुष संबंध व लैंगिकतेची अभिव्यक्ती :**

पेठे यांच्या लेखनात स्त्रीच्या लैंगिकतेचा स्पष्ट, पण संकोचविरहित उल्लेख दिसतो.

उदाहरणार्थ, स्त्री पात्र आपली लैंगिक ओळख स्वीकारते, प्रश्न विचारते, आणि समाजाच्या चौकटींना छेद देते. लैंगिक संबंधांतील भावनिक गुंतवणूक, अपेक्षा आणि फसवणूक यांचंही जिवंत चित्रण त्यांच्या कथा करतात.

**५. अस्तित्व – पुसटतेपणातून दृश्यमानतेकडे:**

या कथांतील अनेक पात्रे अस्तित्वाच्या कड्यांवर उभी आहेत. त्यांच्या भोवतालचं जग त्यांना अदृश्य करत असतं आणि त्या या अदृश्यतेतून स्वतःला शोधू पाहतात. 'हंसा अकेला' मध्ये हंसा ही 'अकेली' असली, तरी ती एक 'जगणारी' स्त्री आहे. तिच्या अस्तित्वाची लढाई ही समाजाशी नाही, तर स्वतःच्या आतल्या कोलाहलाशी आहे.

त्याचप्रमाणे 'आंधळ्याच्या गाई' या शीर्षककथेत 'गाई' या प्रतिमेतून ग्रामीण, निम्नवर्गीय, दबलेल्या स्त्रीचे अस्तित्व अधोरेखित होते. त्या गाई नुसत्या आंधळ्या नाहीत, तर त्यांच्या आंधळेपणात समाजाने जबरदस्तीने लादलेली दुर्बोधता आहे. मेघना पेठे अस्तित्वाचा प्रश्न या प्रतीकांमधून उलगडतात आणि त्यातून स्त्रीच्या 'जगण्याच्या' लढ्याला आशयघनतेने उभं करतात.

**६. स्त्रीच्या अस्तित्वाचा संघर्ष:**

मेघना पेठे यांचे लेखन स्त्रीवादी विचारसरणीवर आधारलेले असले तरी ते घोषणात्मक नाही. त्यांच्या कथा कोणतेही आरोप-प्रत्यारोप न करता, स्त्रीचा आत्मानुभव आणि सामाजिक अनुभव यांची मांडणी करतात. त्यांनी बळजबरीने 'पुरुषविरोध' मांडलेला नाही, तर पितृसत्ताक व्यवस्थेतील गूढ, सूक्ष्म आणि बधित करणारे स्वरूप स्पष्ट केले आहे.

कथांतील स्त्रीने सामाजिक चौकटी मोडाव्यात असा आग्रह नाही, पण त्या चौकटींचा अस्वस्थपणे विचार करत तिला त्यातून मार्ग काढायचा असतो.

"स्त्रीने स्वतंत्र असावं" हे फक्त घोषणात्मक न ठेवता, त्यामागील मानसिक आणि सामाजिक संघर्षाचा तपशील त्यांच्या लेखनातून जाणवतो.

**७. कथांचे शैलीवैशिष्ट्य व वैशिष्ट्यपूर्ण विषयवस्तू :**

कथांमध्ये विषयवस्तू ही वैयक्तिक असूनही ती सार्वत्रिक वाटते.

लेखिकेने साचेबद्ध पद्धतीनं कथा सांगण्याऐवजी अनुभवाला जागवणारी शैली स्वीकारली आहे.

कल्पना व वास्तव यांचा सुंदर समन्वय त्यांच्या कथांमध्ये दिसतो.

त्यांच्या कथांमध्ये 'सूक्ष्मतेने व्यक्त होणारी भावना' हे मोठे सामर्थ्य आहे.

**८. कथेची भाषाशैली:**

मेघना पेठे यांच्या कथालेखणाची भाषा अत्यंत सूक्ष्म, सौंदर्यपूर्ण आणि तरल आहे. ती फाजील अलंकारिक नसून अर्थपूर्ण आहे.

काही कथांमध्ये निवेदन हे अंतर्मुख आहे म्हणजे 'मी'च्या रूपातून कथानक उलगडते — जे वाचकाला पात्राच्या भावविश्वात थेट घेऊन जाते.

पेठे यांच्या लेखनशैलीत गद्य आणि कवितेचा सौंदर्यपूर्ण संगम आढळतो. त्यांची भाषा ही भावनांच्या अतिसूक्ष्म हालचाली टिपणारी असून, प्रतिमा आणि लक्षणांचा प्रभावी वापर त्यांच्या लेखनात जाणवतो. 'हंसा अकेला' मधील 'हंसा' ही प्रतिमा पारंपरिकतेचा त्याग करणाऱ्या स्त्रीचे प्रतीक ठरते, तर 'आंधळ्याच्या गाई' हे शीर्षकच एका प्रखर सामाजिक अभिव्यक्तीचे प्रतीक ठरते.

त्यांचा गद्यशैलीतून कविता साकारते आणि हळुवारपणे पण ठामपणे समाजाच्या खोट्या रचना उघड करते. प्रसंगी त्यांच्या लेखनात काव्यात्मक उद्विग्नता आढळते, जी वाचकाला अस्वस्थ करते आणि विचारप्रवृत्तही करते.

**निष्कर्ष :**

हंसा अकेला मधील कथा वैयक्तिक, अंतर्मुख स्वरूपाच्या आहेत. त्या स्वतःशी प्रामाणिक संवाद साधतात. या कथासंग्रहातील एकटी स्त्री वैयक्तिक गाठी उकलणारी एकाकी पण विचारतील दिसून येते.

ISSN : 2395-6968

आंधळ्याच्या गाई मध्ये कथा अधिक प्रतीकात्मक आहेत – जसे की “आंधळ्या गाई” हे प्रतीकच एक संपूर्ण सांस्कृतिक मानसिकतेचे प्रतिनिधित्व करते. येथील मुलगी वडील पित्रसक्तकता मुलगी त्या पिढीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणारी आहे.स्त्रीचे अंतर्मन केंद्रस्थानी: दोन्ही संग्रहांत स्त्रीच्या भावविश्वाचे सूक्ष्म चित्रण आहे.

नात्यांतील ताण: कधी पती, कधी वडील – स्त्रीचं स्वतःशी आणि इतरांशी नातं नेहमी गुंतागुंतीचं असतं.

स्वतःच्या अस्तित्वाचा शोध: स्वतःला सापडण्याची प्रक्रिया – हा दोन्ही कथासंग्रहांचा गाभा आहे.

मेघना पेठे यांच्या ‘हंसा अकेला’ आणि ‘आंधळ्याच्या गाई’ या दोनही कथासंग्रहांत स्त्रीजीवनाच्या विविध छटा – एकटेपणा, संघर्ष, नात्यांतील विसंवाद, आणि अस्तित्वाचा शोध – अत्यंत प्रभावी शैलीत सादर होतात.

हंसा अकेला वैयक्तिक आणि भावनिक गहिवर असलेला संग्रह आहे.हंसा अकेला या कथासंग्रहाचा आशय स्त्रीच्या अस्तित्वाच्या शोधाभोवती फिरतो.लैंगिकता ही नुसती शारीरिक गरज नसून मानसिक व सामाजिक गुंतागुंतीचा भाग आहे, हे अनेक कथांमधून सूक्ष्मतेने व्यक्त होते.

यात सामाजिक चौकटी, परंपरेचे बंधन, लैंगिकतेची गुंतागुंत आणि स्त्री-पुरुष संबंधांचा भावनिक गुंता हे सारे परखडपणे मांडलेले आहे.

आंधळ्याच्या गाईमध्ये प्रतीकात्मकतेद्वारे सामाजिक ढाच्यांची सूक्ष्म चिकित्सा आहे.

मेघना पेठे यांचे कथालेखन हे आधुनिक मराठी स्त्रीसाहित्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यांनी स्त्रीजीवनातील असंख्य अपरिभाषित भावना, आकांक्षा आणि बंधनांचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या कथा या केवळ मनोरंजनासाठी नसून, अंतर्मुख करणाऱ्या आणि मनात विचारांचे वादळ निर्माण करणाऱ्या आहेत. त्या आजच्या स्त्रीच्या अस्मितेचा, अस्तित्वाच्या शोधाचा एक गहिरा दस्तावेज आहे.मेघना पेठे यांच्या ‘आंधळ्याच्या गायी’ या कथासंग्रहात स्त्रीजीवनातील भावनिक गुंतागुंत, अन्याय आणि अंतर्मनातील स्फोटक

वास्तवाचे चित्रण आहे. यात स्त्रीवर लादलेली मूल्ये, विवशता, लैंगिक शोषण, मानसिक ताण आणि आत्मशोध हे प्रमुख आशय आहेत. नायकिणींचे अंधारलेले जीवन, बधीर समाजव्यवस्था, आणि स्त्रीच्या गोंधळलेल्या अस्मितेची ही कथा आहे. लेखिकेने 'गायी' या प्रतीकेद्वारे स्त्रीच्या सौम्य, सहनशील पण आंधळ्या बनवलेल्या अवस्थेचे चित्र रेखाटले आहे.

स्त्रीची वेदना, मौनातला आकांत, पुरुषसत्ताक चौकटीत अडकलेली तिची ओळख आणि स्वातंत्र्याची धडपड — या कथा अशा अनेक पातळ्यांवर संवाद साधतात. या कथांतून हळुवार पण जबरदस्त विद्रोह उमटतो. संवेदनशील भाषाशैली, प्रतीकात्मकता आणि वास्तवाचा कलात्मक आलेख हे या कथांचे आशयात्मक वैशिष्ट्य आहे. एकूणच, 'आंधळ्याच्या गायी' स्त्रीमनाच्या खोल जखमा समोर आणणारा, अस्वस्थ करणारा आणि विचारप्रवृत्त करणारा संग्रह आहे.

मेघना पेठे यांच्या 'हंसा अकेला' आणि 'आंधळ्याच्या गाई' या कथासंग्रहांचे सखोल विश्लेषण करताना स्पष्ट होते की, त्यांच्या लेखनात स्त्रीच्या वेदनेचा गहिवर, अस्तित्वाच्या उंबरठ्यावरचा झगडा आणि आत्मशोधाची निरंतर वाटचाल ही त्रिसूत्री प्रभावीपणे व्यक्त होते. हे लेखन कुठेही केवळ भावना व्यक्त करणारे न राहता, ते एक मानसिक, सामाजिक आणि अस्तित्ववादी प्रक्रिया म्हणून समोर येते. त्यांच्या लेखनाची सर्जनशीलता आणि सामाजिक जाणिवा वाचकाला अंतर्मुख करतात. आजच्या स्त्रीवादी साहित्याच्या प्रवाहात मेघना पेठे यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे आणि त्यांच्या लेखनाचा अभ्यास स्त्रीच्या बदलत्या संवेदनांचा आरसा ठरतो.


ISSN : 2395-6968

## संदर्भसूची

१. पेठे मेघना – हंसा अकेला, मेनका प्रकाशन.

२. पेठे मेघना – आंधळ्याच्या गाई, लोकवाङ्मय गृह.

३.डॉ.महाजन वंदना : 'सांस्कृतिक प्रवाहांची स्त्रीवादी समीक्षा'

४. देशमुख कुमुदिनी –'स्त्रीवादी लेखनाचे स्वरूप'

५.वरखेडे मंगला

'स्त्रीवादी समीक्षा: संकल्पना व उपयोजन'

६. आपटे म. ना. – 'समकालीन कथा समीक्षा', अ. भा. मराठी साहित्य परिषद

७. बगे आशा –'स्त्री-अस्तित्व आणि लेखन.'

८.डॉ. धोंगडे अश्विनी - 'स्त्रीवादी समीक्षा '



ISSN : 2395-6968